# लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये महामानवाचा १३२ वा जन्मदिवस उत्साहात साजरा.





वडाळा : श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्था वडाळा येथे महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिवस उत्साहात साजरा करण्यात आला, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लोकमंगल आयटीआयचे प्राचार्य माननीय श्री योगेश गायकवाड सर यांच्या मार्गदर्शनाखाली लोकमंगल आयटीआय चे निदेशक माननीय श्री रमेश लवटे सर लाभले होते. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून लोकमंगल आयटीआयच्या निदेशिका माननीय अरुणा कोरे मॅडम व्यासपीठावर उपस्थित होत्या, तसेच कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून लोकमंगल आयटीआय मधील जोडारी शाखेमध्ये प्रशिक्षण घेत असलेला प्रशिक्षणार्थी कुमार गणेश रोकडे यांची व्यासपीठावर आदरणीय उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन, तसेच श्री संभाजी जाधव सर यांनी रेखाटलेल्या महामानवाच्या चित्रातील प्रतिमेचे पूजनाने झाली हे कार्य कार्यक्रमाचे उद्घाटक माननीय अरुणा कोरे मॅडम यांच्या हस्ते पार पडले, कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय रमेश लवटे सर यांनी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथींची ओळख करून दिली, तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित भव्य असे व्याख्यान दिले, सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे विजतंत्री विभागाचे निदेशक

श्री संभाजी जाधव सर यांनी केले, कार्यक्रमाचे व्यवस्थापकीय संचालन श्री राहुल गवळी सर, श्री आकाश राठोड सर आणि श्री सौरभ दहिटणकर सर यांनी पाहिले, त्याचप्रमाणे या कार्यक्रमाला लोकमंगल आयटीआयच्या विविध शाखेमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या 80 विद्यार्थ्यांची हजेरी होती.